महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दूरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल: cetcell@mahacet.org


क्र.आस्था-१९१९/प्र.क्र.६१/हाऊसकीपिंग सर्व्हिसेस/सेवापूरवठादार/२०९/२०२५ दिनांक 7 FEB 2025

प्रति,

...........

...........

...........

विषय - राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण या दोन कार्यालयाच्या हाऊसकीपिंग सर्व्हिसेस संदर्भात खुल्या बाजारातून दरपत्रके मागवून सेवापुरवठादार निश्चित करण्याबाबत.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण या दोन्ही कार्यालयाच्या हाऊसकीपिंग सर्व्हिसेस संदर्भात खुल्या बाजारातून दरपत्रके मागवून सेवापुरवठादार निश्चित करण्यासाठी पुरवठादारांनी आपले दरपत्रके दिनांक १४/०२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत या कार्यालयास बंद लिफाफयामध्ये जमा करावी. तात्काळ मागवून सेवापुरवठादार निश्चित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. दरपत्रकामधील दर अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे.

किमान दरपत्रकाचे दर स्विकृत करण्यात येतील. तथापि सर्व /कोणतेही दरपत्रक अस्विकृत करण्याचे अधिकार आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्या सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राहतील.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत- संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या दरपत्रकाचा मागविण्याचा मसुदा

महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५१ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com

क्र.आस्था-१९१९/प्र.क्र.६१/ हाऊसकिपींग सर्व्हिसेस दरपत्रके मागविण्याबाबत/ 209 /२०२५ दिनांक - 7 FEB 2025

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकडून साफसफाई (HOUSEKEEPING) च्या कामासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष ८ व ९ वा मजला, न्यु-एक्सलसीअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई या दोन्ही कार्यालयाच्या स्वत:च्या जागेच्या साफसफाईसाठी (HOUSEKEEPING) नोंदणीकृत बाह्ययंत्रणा संस्थांकडून अकरा महिन्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी दरपत्रके मागण्यात येत आहेत.

दरपत्रके सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## A. पक्षकार :-

१. करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई राहतील.

## B. साफसफाई (Housekeeping) ची सेवा देणाऱ्या संस्थेसाठी अटी व शर्ती :-

१. कंत्राटदार कार्यालयांच्या दैनंदिन साफसफाईसाठी दोन्ही कार्यालयासाठी प्रत्येकी १ प्रमाणे एकूण २ कर्मचारी पुरवतील व त्यांच्या मदतीने परिशिष्ट -१ मध्ये नमुद केल्यानुसार साफसफाईचे काम करुन घेतील.

२. कंत्राटदारास सफाईगार कर्मचाऱ्यास किमान वेतन अधिनियम, १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल.

३. उदयोग ऊर्जा कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दिनांक २४/०७/२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर/बोनस/कामगार कल्यान निधी या दायित्वांचा समावेश करुन एकूण किमान व वेतन व भत्ते परिगणित करण्यात आलेले आहे. त्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहिल.

४. राज्य सरकारने वेळोवेळी प्रस्तुत केलेला राज्य कर (दर) अधिसूचना तसेच केंद्र सरकारने वेळोवेळी प्रस्तुत केलेला केंद्रीय कर (दर) अधिसूचना याप्रमाणे लागू असलेला कर,

परिपत्रक, शासन निर्णय, स्पष्टिकरण सेवा कराची विहित दरानुसार आकारणी करण्यात येईल.

## C. दरपत्रक संबंधीच्या अटी व शर्ती :-

a) **तांत्रिक दरपत्रक**

१. संबंधित संस्था/अर्जदार ही खालील पैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)

- मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८
- भागीदारी संस्था अधिनियम, १९३२
- सहकारी संस्था अधिनियम, १९६१
- कंपनी अधिनियम, १९५६

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४. दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्र.३/अ.क.३.१ व प्रकरण क्र.६/ परिशिष्ट ८ मधील तरतुदीनुसार निविदा/दरपत्रक अर्जासोबत प्रत्येकी दोन डी.डी. दोन्ही कार्यालयाच्या नावाने **Earnest Money Deposit (Refundable) EMD DD - रु.५०००/-** बयाना रक्कम धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) १) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे नावाने (In favour of COMMISSIONER STATE COMMON ENTRANCE TEST CELL, Mumbai payable at Mumbai) तसेच २) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे नावाने (In favour of SECRETARY ADMISSION REGULATING AUTHORITY, Mumbai payable at Mumbai) देण्यात यावा.

फक्त रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्र.क्र. २६७/रोस्वरो-१, दिनांक १७/०८/२००२ मधील अ.क्र. ८ अन्वये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा/दरपत्रक भरताना निविदा शुल्क/ बयाना रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे. त्याअनुषंगे आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. याव्यतिरीक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासून सुट मिळण्याची अट या निविदेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणा-या संस्थांना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल.

३. आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी.

४. वस्तु व सेवाकर कायदा, २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे.

५. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना (EPF/SEIS) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

६. मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना बहुद्देशिय कर्मचारी कंत्राटी तत्वावर पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

७. संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखापेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडण्यात याव्यात.

८. संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलिस चौकशी/ तपास/न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याने हमीपत्र संस्थेच्या पालकांचे सहीनिशी जोडण्यात यावे.

९. कंत्राटाचा कालावधी कमी करण्याचे अथवा कंत्राट रद्द करण्याचे अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई याचेकडे राखून ठेवण्यात येतील.

b) व्यापारी लिफाफा

१. प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयामध्ये प्रत्येकी १ पुरुष अशा एकूण २ पदांसाठी किमान वेतन अधिनियम, १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल.

२. उदयोग उर्जा कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दिनांक २४/०७/२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. याबाबतचा सविस्तर तपशिल कंत्राट मान्य झाल्यानंतर कंत्राटदाराकडून कार्यालयास सादर करावा.

३. कंत्राटदाराने/पुरवठादाराने/निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे.

४. कंत्राटदार/पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

## D. दरपत्रक छाननीबाबत :-

१. कंत्राटदाराने/पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रक उघडण्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध/विधीग्राह्य असतील.

२. दरपत्रक शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रका मध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.

३. तांत्रिक दरपत्रके उघडल्यानंतर दरासंबंधिचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकांचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे/ पुरवठादाराचे न्यूनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले कर तुलना करताना विचारात घेण्यात येतील. त्यानंतर न्युनतम ठरलेल्या दरपत्रकाच्या आधारे दर स्विकृत करण्यात येतील.

४. प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

५. शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार बीड छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे राखुन ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदारावर/ पुरवठादारावर यांना मान्य करणे बंधनकारक राहिल.

## E. पात्र निविदाकाराने/पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :-

१. उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/ उद्योग-४, दिनांक ०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्र.४/अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास/पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत **Performance Security deposit of form of Bank Guarantee/ DD - ३ % of Total Amount of Tender (Refundable)** या कार्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई (In favour of COMMISSIONER STATE COMMON ENTRANCE TEST CELL, Mumbai payable at Mumbai) यांचे नावे द्यावी लागेल. २) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे नावाने (In favour of SECRETARY ADMISSION REGULATING AUTHORITY, Mumbai payable at Mumbai) यांचे नावे द्यावी लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत जमा न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. पात्र कंत्राटदाराने/पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये १००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

३. करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार/दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रक्कमेतून करण्यात येईल.

४. कंत्राटदाराकडून/पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल.

५. करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल.

६. प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा/संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

## F. मासिक पारिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपध्दती :-

१. मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर प्रशासकीय विभाग, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडून रुजू झाल्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात

येईल. तसेच प्रशासकीय विभाग संबंधित उमेदवारांची बायोमॅट्रीक मशीनमध्ये तसेच हजेरीपटावर नोंद घेतील.

२. प्रशासकीय विभाग, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी कार्यालयातील सफाई कर्मचाऱ्यांचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील.

३. प्रशासकीय विभाग, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यालयातील नियमित सफाईगार व कंत्राटी सफाईगार कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवावे.

४. लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे नियंत्रणाखाली असलेल्या कंत्राटी सफाईगारांचे मासिक पारिश्रमिक देयक त्या त्या कार्यालयात कंत्राटदाराने/उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार/ पुरवठादार यांना ई प्रदान (NEFT/ECS/RTGS) संबंधित कार्यालयामार्फत करण्यात येईल.

कंत्राटदारास/पुरवठादारास बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास मासिक परिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल. त्यानंतर पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल.

५. कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने/पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque) NEFT/ECS/RTGS व्दारे जमा करणे आवश्यक राहील.

६. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास दिलेल्या पारिश्रमिकांच्या/इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकित प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/ पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.

७. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील.

८. कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करुन संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडून ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार/ पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.

९. कंत्राटदारास/पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/वस्तू व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तू व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसूचना क्र. ५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू विषयक एका संविदाखालील मूल्य रु.२,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तु किंवा सेवा

यांच्या पुरवठयासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमेतून विहित दरानुसार कपात करण्याची लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागु करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१०. व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील.

११. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दि.२२/०२/२०१९ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करण्यासंबंधिच्या "जोडपत्र-अ" मधील तरतूदी कंत्राटदारास/पुरवठादारास/निविदाकारास बंधनकारक राहतील (प्रत संलग्न).

१२. लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक परिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतूदीनूसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरून करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र लेखा अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व सहायक लेखा अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश संबंधितांकडून निर्गमित करण्यात येतील.

वर नमूद अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या बाह्ययंत्रणेच्या संस्थाकडून प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांच्या स्वत:च्या जागेची दैनंदिन साफसफाईसाठी (Housekeeping) प्रत्येकी १ पुरुष कर्मचारी एकुण २ कर्मचारी ११ महिन्यांकरीता सेवा घेण्यासाठी निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तसेच संबंधित कंत्राटदाराच्या समाधानकारक कामगिरीच्या अधीन राहून परस्पर संमतीने त्यांना दोन वर्षासाठी त्याच दराने मुदतवाढ दिली जाऊ शकते.

ठिकाण : मुंबई
दिनांक :

**सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा,**
**आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# Annexture 1

## प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या स्वत:च्या जागेच्या सफाईसाठी

(प्रत्येकी १ पुरुष एकुण २ कंत्राटी अकुशल कर्मचारी) कामासंबंधीचे विवरण

| अ.क्र. | कामाबाबतचे तपशील | कामाची वारंवारिता | काम करण्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | फरशी, लॉबीच्या स्वच्छतेबाबत | दररोज दिवसातून एकदा | झाडणे, डिटर्जंट/फिनाईल वापरुन साफ करणे व कोरड्या कपड्याने पुसून घेणे. |
| २ | वॉश बेसिन, प्रसाधनगृहे (सर्व) | दिवसातून तिनदा | कार्यालयातील प्रसाधनगृहे डिटर्जंट व फिनेल वापरून दिवसातून तीन वेळा म्हणजे सकाळी ०९.३० पुर्वी, दुपारी ०१.०० वाजता व सायंकाळी ०४.०० पुर्वी साफ करणे |
| ३ | खिडक्यांच्या लोखंडी जाळ्या, खिडक्यांची चौकट, काचा, पंखे व दरवाजे, प्रसाधनगृहे, अग्निशमन नळकांड्या | आठवड्यातुन एका ठराविक दिवशी | ओल्या कपड्याने स्वच्छ करून कोरड्या कपड्याने पुसून घेणे. |
| ४ | अधिकारी/कर्मचारी यांचे टेबल, संगणक सामुग्री इ. | दररोज दिवसातून एकदा | कार्यालयीन वेळेपुर्वी डस्टरचा वापर करून स्वच्छ ठेवावे. |
| ५ | कार्यालयातील भिंती, स्तंभ, मोकळी जागा इ. | आठवड्यातून ठराविक दिवशी | झाडून धूळ, जाळे काढून स्वच्छ करणे. |
| ६ | कचऱ्याची विल्हेवाट | दररोज दिवसातून एकदा | जमा झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे. |
| ७ | अधिकारी वर्गाच्या तसेच कार्यालयीन पार्टीशनच्या काचा, दरवाजे, फोटो फ्रेम्स, खिडक्यांच्या काचा/तावदाने तसेच अधिकारी वर्ग दालनांचे अंतर्गत पार्टीशन्स, कर्मचारी/ अधिकारी यांच्या खुर्च्या | आठवड्यातून एकदा | ग्लास क्लिनींग किटचा वापर करून स्वच्छ ठेवावी. |
| ८ | ट्युब लाईटस्, इलेक्ट्रीक बल्ब | महिन्यातून एकदा | स्पंज कीट/डस्टरचा वापर करून स्वच्छ ठेवावी. |

<u>दरपत्रक प्रपत्र</u>

पुरवठादारांचे नांव :-

| अ.क्र. | बाब | अकुशल कामगारांसाठी दर (प्रतिमाह) रुपये मध्ये |
|---|---|---|
| १ | मुळ वेतन (Basic Pay) | |
| २ | विशेष भत्ता (Special Allowance) | |
| ३ | कामगार कायद्यातील तरतूदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम जसे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना, निवृत्ती वेतन निधी, कर्मचारी कल्याण निधी, व्यवसाय कर इत्यादी. | |
| ४ | कंत्राटदार/पुरवठादाराचे प्रशासनिक सेवा खर्च (Firms Administrative Charges) | |
| | एकुण | |

अक्षरी रक्कम रूपये................................................

ठिकाणः-

दिनांकः-

स्वाक्षरी

वरील पैकी बाब क्र. १ व २ चे संदर्भात राज्य शासनाने अकुशल कामगारासाठी निश्चित केलेल्या अद्यावत अस्तित्वात असलेल्या दरांची प्रत जोडणे आवश्यक राहील. अ.क्र. ३ चे बाबतीत संबंधित कायद्यात तरतूदीनुसार दिलेल्या दराचे आदेश जोडणे आवश्यक आहे.

# जोडपत्र – अ

## General Terms & Conditions for RFP regarding payment to the vendor for the Deployment of Contractual Manpower at Government Department

१. After selection of the "outsourcing agency" as Contractor, a price schedule shall be annexed to the Articles of Agreement according to which all payments shall be made to the contractor by the "Department"; (Government Department/State Government PSU/ Autonomous Body/Board formed by Act of State Government of Maharashtra) for the services rendered.

२. After signing of the agreement, the outsourcing agency shall deploy the competent manpower at the required office of Department or any other site mentioned by the Department. On rendering his/her services to the Department every month, the outsourcing agency shall pay the wages/salaries to the manpower resource by mode of e-payment directly in the account of the manpower resource. At the time of raising any invoice, the details of the previous month°s payments done along with the reference to transaction details of RTGS/NEFT shall be attached along with the invoices. The contractor has to raise invoice with all supporting documents.

३. The outsourcing agency should make the payment to the deployed manpower through NEFT/ RTGS Bank transfer only. All payment made to the manpower resources deployed shall be mandated through bank account of the personnel by the outsourcing agency.

४. The outsourcing agency shall be wholly and exclusively responsible for payment of wages to the persons engaged by it in compliance of the statutory obligation under all related legislations as applicable to it from time to time including Minimum Wages Act Contract Labour, Provident Fund, ESIS. Gratuity, Bonus, leave & Professional Tax etc. Department shall not incur any liability for any expenditure whatsoever on the manpower resources deployed by the outsourcing agency on account of the obligation. The outsourcing agency shall be required to provide particulars of documentary proof/papers deposited to the respective statutory bodies/Government departments, i.e. Employees State Insurance, Provident Fund and Service Tax of its manpower resources deployed under the agreement while submission of invoice.

५. The outsourcing agency shall pay the deployed manpower resources as per the latest revised rates of wages fixed by the "Government" along with all statutory obligations. The Actual rates of wages for the manpower resources shall be fixed at the time of the execution of the agreement with the outsourcing agency with the approval of the Government and the wage rates so decided should fulfill all statutory norms issued by Government for example Wages Act: Minimum Wages Act: Employer°s Liability Act: the workmen compensation Act; industrial Dispute Act; Maternity Benefit Act.

६. The outsourcing agency shall ensure that the wages/salaries of the manpower resources deployed to the Department are released latest by dated ५th of every month, irrespective of receipt of payment from Department.

७. The variation in statutory compliances such as minimum wages, EPF, ESIS etc. will be considered on production of the documentary evidences by the outsourcing agency and upon approval of the Department.

८. The outsourcing agency shall issue his / her Company॰s salary slip to all manpower resources deployed at Department॰s office on monthly basis. It shall be outsourcing agency॰s duty to pay monthly salary and other dues as applicable directly into manpower resources bank account. The leaves pre-approved by concerned authority of the Department shall be allowed to the deployed manpower as per the prevailing statutory provisions. No wage / remuneration shall be paid to any manpower resources for the days of unauthorized absence from duty. No wage/rem uneration shall be paid to any manpower resources for the days of unauthorized absence from duty.

९. The manpower resource deployed by outsourcing agency under the agreement shall not claim nor shall be entitled for any perks and other facilities contractual period. These manpower resources shall not have right to demand for any type of permanent employment with the Department or its allied offices. These manpower resources shall not claim any benefit/ compensation / absorption/regularization of services with Department.

१०. The outsourcing agency shall comply with all the applicable law and rules of the Government of India. Government of Maharashtra and the Local Bodies. The outsourcing agency should at all times indemnity the Department against all claims, damages and compensations against the provision of Payment of Wages Act: Minimum Wages Act; Employers Liability Act: the workmen compensation Act; Industrial Dispute Act; Maternity Benefit Act, or any modification thereof or any other law relating thereto and rules made hereunder from time to time. The Govt. department will not own any responsibility in this regard. Any failure to comply with any of the above regulation or any deficiency in service will render this contract liable for immediate termination without any prior notice.